CNR No. MHRG040031622025

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३४३/२०२५ मधील निशाणी क्र.१३ वरील आदेश**</u>

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, मयताची आई बीबी युयुस नाईक या दिनांक १४/०१/१९९८ रोजी मयत असल्याबाबत मुळ अर्जात नमुद करावयाचे राहुन गेले असुन सदरहू दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

३. अभिलेखाचे अवलोकन करता व अर्जदार यांचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, अर्जदारांनी सदरहू अर्ज वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रस्तावित दुरूस्ती केल्यास अर्जाच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. सदरहू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

अर्जदारांना मुळ अर्जात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR

Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.01.23 17:41:46 +0530

पनवेल **(ए.एस. बडगुजर)**
दिनांक २२/०१/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल